महाराष्ट्र गट-क सेवा (मुख्य) परीक्षा - 2018
लिपिक-टंकलेखक, दुय्यम निरीक्षक व कर सहायक) पेपर क्र. 1 (संयुक्त पेपर)

**A**

→ संच क्रमांक

परीक्षा दि. 14/ऑक्टोबर/2018

**2018**

प्रश्नपुस्तिका क्रमांक
**BOOKLET NO.**

**B12**

107413

**प्रश्नपुस्तिका-I**

**मराठी व इंग्रजी**

वेळ : 1 (एक) तास

एकूण प्रश्न : 100

एकूण गुण : 100

## सूचना

(1) सदर प्रश्नपुस्तिकेत 100 अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. असा तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

(2) आपला परीक्षा-क्रमांक ह्या चौकोनात **न विसरता बॉलपेनने** लिहावा.

| परीक्षा-क्रमांक | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|

↑ केंद्राची संकेताक्षरे ↑ शेवटचा अंक

(3) वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे **न विसरता नमूद करावा.**

(4) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना 1, 2, 3 आणि 4 असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तरक्रमांक नमूद करताना तो संबंधित प्रश्नक्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

(5) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. क्रमाने प्रश्न सोडविणे श्रेयस्कर आहे पण **एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नाकडे वळावे.** अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नांकडे परतणे सोईस्कर ठरेल.

(6) उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही.

(7) **प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच "उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची दिलेल्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या प्रत्येक चार चुकीच्या उत्तरांसाठी एका प्रश्नाचे गुण वजा करण्यात येतील".**

## ताकीद

**ह्या प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपेपर्यंत ही प्रश्नपुस्तिका आयोगाची मालमत्ता असून ती परीक्षाकक्षात उमेदवाराला परीक्षेसाठी वापरण्यास देण्यात येत आहे. ही वेळ संपेपर्यंत सदर प्रश्नपुस्तिकेची प्रत/प्रती, किंवा सदर प्रश्नपुस्तिकेतील काही आशय कोणत्याही स्वरूपात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे कोणत्याही व्यक्तीस पुरविणे, तसेच प्रसिद्ध करणे हा गुन्हा असून अशी कृती करणाऱ्या व्यक्तीवर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचा अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार तसेच प्रचलित कायद्याच्या तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.**

**तसेच ह्या प्रश्नपत्रिकेसाठी विहित केलेली वेळ संपण्याआधी ही प्रश्नपुस्तिका अनधिकृतपणे बाळगणे हा सुद्धा गुन्हा असून तसे करणारी व्यक्ती आयोगाच्या कर्मचारीवृंदापैकी, तसेच परीक्षेच्या पर्यवेक्षकीयवृंदापैकी असली तरीही अशा व्यक्तीविरुद्ध उक्त अधिनियमानुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती शिक्षेस पात्र होईल.**

**पुढील सूचना प्रश्नपुस्तिकेच्या शेवटच्या पृष्ठावर पहा**

पर्यवेक्षकांच्या सूचनेविना हे सील उघडू नये

SEAL

कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK

1. 'जलाभेद्य' या शब्दाचा पुढीलपैकी कोणत्या वाक्यांमधील उपयोग योग्य आहे ?
   (अ) नदीच्या विशाल प्रवाहाने दोन्ही गावे जलाभेद्य झाली आहेत.
   (ब) यंत्रांच्या खोक्यांवर जलाभेद्य आवरणे पाहिजेत.
   (क) मातीची भांडी जलाभेद्य असल्याने गार होतात.
   (ड) जलाभेद्यतेमुळे सुती कापड अधिक पाणी शोषते.
   **पर्यायी उत्तरे :**
   (1) फक्त (अ) (2) फक्त (ब) (3) (अ) आणि (क) (4) (अ) आणि (ड)

2. 'धारेकरी' हा शब्द पुढीलपैकी कोणत्या शब्दसमूहासाठी उपयोगात येतो ?
   (अ) धाऱ्याने जमीन घेणारा (ब) तलवार बहाद्दूर मनुष्य
   (क) धार करून देणारा (ड) धारण करणारा
   **पर्यायी उत्तरे :**
   (1) फक्त (अ) (2) फक्त (ब)
   (3) (अ), (ब) आणि (क) (4) (अ), (ब) आणि (ड)

3. 'मी मी म्हणणे' या वाक्प्रचाराचा अर्थ पुढीलपैकी काय ?
   (1) सहमती देणे (2) स्वत:ची बढाई मारणे (3) गोंधळून जाणे (4) वर्दळीवर येणे

4. 'दशा' हा शब्द पुढीलपैकी कोणत्या वाक्यांमध्ये उपयोगात आणून त्यांचे पुनर्लेखन करता येईल ?
   (अ) सततच्या मेहनतीने त्याची परिस्थिती सुधारत गेली.
   (ब) जमिनीवरच्या सतरंजीची सुते निघाली होती.
   (क) वडिलांच्या मतानुसार, आता त्याच्या नशिबाचे ग्रह चांगले होते.
   (ड) हरवलेल्या पुस्तकाच्या शोधात त्याने दाहीदिशा पालथ्या घातल्या.
   **पर्यायी उत्तरे :**
   (1) (अ) आणि (ब) (2) (ब) आणि (क)
   (3) (अ), (ब) आणि (क) (4) (ब), (क) आणि (ड)

5. पुढील काव्यपंक्ती कोणत्या शब्दशक्तीचे उदाहरण आहे ?
   "अंबरगत पयोधराते रगडूनि पळतो दुरी।"
   (1) अभिधा (2) लक्षणा
   (3) लक्षण लक्षणा (4) श्लेषमूलक व्यंजना

6. 'ऊर्ध्वगामी' या शब्दाचा विरुध्दार्थी शब्द पुढीलपैकी कोणता ?
   (अ) अनुगामी (ब) अधोगामी (क) पुरोगामी (ड) प्रतिगामी
   **पर्यायी उत्तरे :**
   (1) फक्त (अ) (2) फक्त (ब) (3) (अ) आणि (ब) (4) (क) आणि (ड)

7. ''जो विकारी शब्द विशिष्ट अर्थाचा द्योतक नसून, ज्यास पूर्वापार संबंधाने सर्व प्रकारच्या द्वितीय नामाचा अर्थ येऊ शकतो. त्यास __________ म्हणतात''.

(1) विशेषनाम (2) सर्वनाम (3) नाम (4) भाववाचक नाम

8. विशेष किफायत नसलेल्या धंद्याचे वर्णन करताना पुढीलपैकी कोणती म्हण वापरली जाते ?

(1) उथळ पाण्याला खळखळाट फार (2) अंथरूण पाहून पाय पसरावे

(3) घोडे खाई भाडे (4) गाजराची पुंगी वाजली तर वाजली

9. पुढील शब्दांपासून भाववाचक नाम तयार करताना कोणते प्रत्यय वापरावे लागतील ?

(अ) गंभीर (ब) नेता (क) चतुर (ड) खारट

**पर्यायी उत्तरे :**

| | (अ) | (ब) | (क) | (ड) |
|---|---|---|---|---|
| (1) | की | गिरी | आई | आ |
| (2) | ता | त्व | की | आ |
| (3) | ता | गिरी | आई | ता |
| (4) | य | त्व | आई | पणा |

10. पुढील वाक्यातील शब्दयोगी अव्यय ओळखा –

'त्याची आई जाईच्या मांडवाखाली फुले वेचीत होती'.

(1) जाईच्या (2) त्याची (3) वेचीत (4) खाली

11. पुढीलपैकी कोणत्या गटातील शब्द तद्‌भव आहेत ?

(अ) शिष्य, दिवस, वेष (ब) जीभ, शेत, माती

(क) व्यवहार, सुंदर, हर्ष (ड) औषध, वर्ष, अन्न

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (अ) (2) फक्त (ब) (3) (अ) आणि (ब) (4) (क) आणि (ड)

12. 'नमुना' या शब्दास अनेकार्थ असलेला योग्य शब्दगट कोणता आहे ?

(अ) वाक्य, विचार, संदर्भ (ब) कबूल, नामंजूर, परवानगी

(क) उदाहरण, मासला, दृष्टांत (ड) नग, वल्ली, ठग

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (अ) बरोबर (2) फक्त (अ), (ब) आणि (क) बरोबर

(3) फक्त (क) बरोबर (4) फक्त (क) आणि (ड) बरोबर

**कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK**

13. पुढीलपैकी कोणते विधान **बरोबर** आहे ?

(अ) पंचमी विभक्तीतून 'अधिकरण' हा कारकार्थ व्यक्त होतो.

(ब) षष्ठी विभक्तीचा 'संबंध' हा कारकार्थ आहे.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (अ) (2) फक्त (ब)

(3) (अ) व (ब) दोन्ही बरोबर (4) (अ) व (ब) दोन्ही चूक

---

14. पुढील शब्द प्रकारास काय म्हटले जाते ?

जा, ये, कर, बस, बोल, पी इत्यादी

(अ) सिद्ध शब्द (ब) साधित शब्द (क) उपसर्ग (ड) तत्सम् शब्द

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (अ) बरोबर बाकी सर्व चूक (2) फक्त (ड) बरोबर बाकी सर्व चूक

(3) फक्त (क) बरोबर बाकी सर्व चूक (4) फक्त (ब) बरोबर बाकी सर्व चूक

---

15. पुढील वाक्यातील क्रियाविशेषण ओळखा :

''सवाई गंधर्व स्मृति समारोहात भीमसेन काय गायिल्येत!''

(अ) काय (ब) स्मृति (क) सवाई (ड) गंधर्व

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (अ) बरोबर (2) फक्त (ब) आणि (क) बरोबर

(3) फक्त (अ) आणि (क) बरोबर (4) फक्त (अ) आणि (ड) बरोबर

---

16. 'व्याज' या शब्दास पुढीलपैकी कोणता पर्याय समानार्थी नाही ?

(1) कपट (2) सोंग (3) भाडे (4) रक्कम

---

17. 'येणार असेल तर येईना बापडा!' या वाक्यातील केवलप्रयोगी अव्यय ओळखा.

(1) येणार (2) येईना (3) बापडा (4) असेल

---

18. 'हातचे सोडून पळत्याच्या पाठीस लागणे,' – या म्हणीस समानार्थी म्हण पुढीलपैकी कोणती ?

(1) उथळ पाण्याला खळखळाट फार (2) अर्धी टाकून सगळीला धावणे

(3) दुरून डोंगर साजरे (4) हजीर तो वजीर

---

19. 'अतिप्रसंग' हा शब्द कोणत्या प्रकारचा शब्द आहे ?

(1) उपसर्ग घटित (2) अभ्यस्त (3) सिद्ध शब्द (4) सामासिक शब्द

---

**कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK**

20. पुढीलपैकी कोणत्या पर्यायातील अधोरेखित शब्द हा नाम आहे ?

(अ) त्या दुष्टाने बरोबर दावा साधला.

(ब) एक म्हातारा माणूस पायरीवर बसला होता.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (अ) मधील (2) फक्त (ब) मधील

(3) (अ) व (ब) मधील (4) (अ) व (ब) दोन्ही मधील नाही

---

21. खालीलपैकी तत्सम् शब्द ओळखा :

(1) भूगोल (2) पाय (3) डोके (4) चिमणी

---

22. पुढील वाक्य कोणत्या लक्षणा शक्तीचे उदाहरण आहे ?

'पानीपतावर सव्वा लाख बांगडी फुटली'.

(1) शुद्धा सारोपा लक्षणा (2) शुद्धा उपादान लक्षणा

(3) गौणी सारोपा लक्षणा (4) लक्षण लक्षणा

---

23. 'बदल घडणे' व्याकरणातील या क्रियेला काय म्हटले जाते ?

(1) सूड (2) वचपा (3) विकार (4) आजार

---

24. 'भाषा + अंतर्गत' हा संधी पुढीलपैकी कोणत्या प्रकारे होतो ?

(1) भाषेंतर्गत (2) भाष्यंतर्गत (3) भाषांतर्गत (4) भाषाअंतर्गत

---

25. 'न्यायसंगत' म्हणजे –

(अ) न्यायास धरून असलेले (ब) न्याय्य

(क) न्यायाशिवायचे (ड) न्यायासंबंधी

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (अ) (2) फक्त (ब) (3) (अ) आणि (ब) (4) (क) आणि (ड)

---

26. 'पाणी' ईकारान्त नपुंसकलिंगी नामाचे सामान्यरूप काय होते ?

(1) 'आ' कारान्त (2) 'या' कारान्त (3) 'वा' कारान्त (4) 'ओ' कारान्त

---

27. 'उखळ पांढरे होणे' या वाक्प्रचाराचा अर्थ पुढीलपैकी कोणता ?

(1) आनंद होणे (2) भांडण करणे (3) भरपूर कष्ट करणे (4) वैभव प्राप्त होणे

---

कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK

28. पुढीलपैकी कोणती वाक्ये विध्यर्थी आहेत ?

(अ) त्याला यंदा पहिला वर्ग मिळाला.

(ब) यावेळी पीक चांगले येईल.

(क) आता थोडं ऊन पडलं तर बरं होईल.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (अ)  (2) फक्त (ब)

(3) (अ) व (ब) दोन्ही  (4) (अ) व (ब) दोन्हीही नाहीत

---

29. एखाद्या शब्दाला प्रत्यय लागल्यावर त्याच्या मूळ रूपात बदल होतो, त्या क्रियेला काय म्हणतात ?

(1) विभक्ती  (2) उपसर्ग  (3) विशेषण  (4) सामान्यरूप

---

30. 'वेलविस्तार' या शब्दातून ध्वनित होणारा अर्थ कोणता ?

(1) एखाद्या संस्थेचा विस्तार होणे  (2) एखाद्या कार्याचा व्याप वाढणे

(3) एखाद्या गोष्टीचा विस्तार होणे  (4) एखाद्या व्यक्तीचा वंश वाढणे

---

31. खालीलपैकी सर्वनामाचे विशेष कोणते ?

(अ) सर्वनामे अनेकवचनी असतात.

(ब) सर्वनामाच्या अनेकवचनांना प्रत्यय लागतात.

(क) सर्वसाधारणपणे सर्वनामाचा वापर अगोदर होतो, तेव्हाच नामाचा वापर होतो.

(ड) सर्वनामाला स्वत:ची वेगळी लिंग, वचन अशी ओळख नसते.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (अ) आणि (ब) बरोबर  (2) फक्त (क) बरोबर

(3) फक्त (ब) आणि (क) बरोबर  (4) फक्त (ड) बरोबर

---

32. पुढीलपैकी कोणत्या वाक्यात दर्शक सर्वनाम आहे ?

(अ) हे मी तुला काल सांगितले ते पुस्तक !

(ब) 'ययाती' वाच. ते फार वाचनीय पुस्तक आहे.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (अ)  (2) फक्त (ब)

(3) (अ) व (ब) दोन्ही मध्ये  (4) (अ) व (ब) दोन्ही मध्येही नाही

---

**कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK**

33. पुढीलपैकी कोणते विधान **बरोबर** आहे ?
(अ) बोलणाऱ्याच्या तोंडचे शब्द दर्शविण्यासाठी दुहेरी अवतरणचिन्ह दिले जाते.
(ब) एखाद्या शब्दावर जोर द्यायचा असेल तरीही दुहेरी अवतरणचिन्ह दिले जाते.
**पर्यायी उत्तरे :**
(1) फक्त (अ) बरोबर
(2) फक्त (ब) बरोबर
(3) (अ) व (ब) दोन्ही बरोबर
(4) (अ) व (ब) दोन्ही चूक

---

34. 'भोजनावसर' हा कोणत्या प्रकारचा समास आहे ?
(1) बहुव्रीही (2) मध्यमपदलोपी (3) तत्पुरुष (4) अव्ययीभाव

---

35. पुढीलपैकी कोणत्या वाक्यात कर्तृकर्मसंकर हा प्रयोग आहे ?
(1) तू ज्योतीला बक्षीस दिलेस.
(2) शिपायाने चोराला पकडले.
(3) मांजराने उंदीर मारला.
(4) गुराख्याने गायीला बांधली.

---

36. 'शाश्वत' या शब्दास विरुद्धार्थी शब्द सांगा.
(1) चिरंतन (2) चिरकाल (3) चिरायु (4) अल्पकाळ

---

37. पुढील वाक्यातील क्रियाविशेषण अव्यये कोणत्या प्रकारची आहेत ?
(अ) पिंटू शाळेतून रडत रडत आला.
(ब) मी त्याला ह्यावरून बोललो.
(क) तेवढं सामान तिकडून आणशील का ?
(ड) तो मोठ्याने ओरडला.
**पर्यायी उत्तरे :**
(1) (अ) विशेषणसाधित, (ब) सर्वनामसाधित, (क) अव्ययसाधित, (ड) नामसाधित
(2) (अ) धातुसाधित, (ब) सर्वनामसाधित, (क) सर्वनामसाधित, (ड) नामसाधित
(3) (अ) धातुसाधित, (ब) सर्वनामसाधित, (क) अव्ययसाधित, (ड) विशेषणसाधित
(4) (अ) नामसाधित, (ब) अव्ययसाधित, (क) सर्वनामसाधित, (ड) विशेषणसाधित

---

38. 'कलागती लावणारा, तंटे उत्पन्न करणारा माणूस' याअर्थी पुढीलपैकी कोणता वाक्प्रचार आहे ?
(1) खप्पीदास (2) गाजरपारखी (3) कळीचा नारद (4) गोमाजी तिमाजी

---

39. पुढीलपैकी कोणत्या शब्दांना 'इक' प्रत्यय जोडून विशेषणे तयार करता येत नाहीत ?
(अ) दिन, काया, विश्व
(ब) पड, पशू, दीन
(क) रस, भाषा, वाचा
(ड) धर्म, समाज, लक्षण
**पर्यायी उत्तरे :**
(1) फक्त (अ)
(2) फक्त (ब)
(3) (अ) आणि (ब)
(4) (ब) आणि (ड)

---

**कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK**

40. पुढील वाक्यांचे मिश्र वाक्य कसे बनवता येईल ? – 'रोपांना काळजीपूर्वक खतपाणी दिले. ती चांगली जोमाने वाढली.'
   (1) रोपे चांगली वाढण्यासाठी त्यांना काळजीपूर्वक खतपाणी दिले.
   (2) रोपांना काळजीपूर्वक खतपाणी दिल्याने ती चांगली वाढली.
   (3) रोपांना काळजीपूर्वक खतपाणी दिले आणि ती चांगली वाढली.
   (4) रोपे चांगली जोमाने वाढली कारण त्यांना काळजीपूर्वक खतपाणी दिले.

---

41. 'बालवयातच मोठ्यांसारखे कष्ट उपसणारी मुले पाहून सर्वांचेच मन द्रवते.' – या वाक्याचे प्रश्नार्थक वाक्य कसे होईल ?
   (1) बालवयातच मोठ्यांसारखे कष्ट उपसणारी मुले पाहून कुणाचे मन द्रवेल ?
   (2) बालवयातच मोठ्यांसारखे कष्ट उपसणारी मुले पाहून कुणाचे मन द्रवणार नाही ?
   (3) बालवयातच मोठ्यांसारखे कष्ट उपसणारी मुले पाहून सर्वांचीच मने द्रवणार नाहीत का ?
   (4) बालवयातच मोठ्यांसारखे कष्ट उपसणारी मुले पाहून सर्वांचेच मन कसे द्रवेल ?

---

42. 'निघून जाणे' याअर्थीचा पुढीलपैकी कोणता वाक्प्रचार वाईट अर्थाने वापरात असतो ?
   (1) गाशा गुंडाळणे (2) गुंगारा देणे (3) वाट धरणे (4) काळे करणे

---

43. 'मी दारात पाऊल ठेवले तोच दिवे गेले.'
   – यातील मुख्य व गौण वाक्यांचे परस्पर रूपांतर कसे होईल ?
   (1) दिवे गेले तेव्हा मी दारात पाऊल ठेवले होते.
   (2) मी दारात पाऊल ठेवल्यावर दिवे गेले.
   (3) दिवे जाताना मी दारात पाऊल ठेवले.
   (4) दिवे गेल्यावर मी दारात पाऊल ठेवले.

---

44. 'पिच्छा पुरविणे' याअर्थी पुढीलपैकी कोणता वाक्प्रचार उपयोगात येतो ?
   (1) पाठ पुरविणे (2) पाठ दाखविणे (3) पाठ देणे (4) पाठ राखणे

---

45. 'मेल्या म्हशीला मणभर दूध !' – या म्हणीतून काय सूचित होते ?
   (1) मोठे नुकसान होणे (2) माणूस गेले म्हणून त्याची किंमत कमी होत नाही
   (3) माणूस गेल्यावरच किंमत कळते (4) गेलेल्या व्यक्तीची वाढवून स्तुती करणे

---

46. 'सगळेच मुसळ केरात !' ही म्हण कशासाठी वापरली जाते ?
   (1) सर्वांचा हिरमोड झाला (2) काही फायदा झाला नाही
   (3) महत्त्वाची गोष्टच विसरली (4) अपेक्षाभंग झाला

---

**कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK**

47. पुढीलपैकी कर्मणी प्रयोगातील वाक्य कोणते ?
(अ) निशा फार वेगात धावते.
(ब) निनादने चित्रपट पाहिला.
**पर्यायी उत्तरे :**
(1) फक्त (अ) (2) फक्त (ब)
(3) (अ) व (ब) दोन्ही (4) (अ) व (ब) दोन्हीही नाहीत

48. पुढीलपैकी कोणते लेखन **योग्य** आहे ?
(अ) संव्हार (ब) संहार (क) सौंहार
**पर्यायी उत्तरे :**
(1) फक्त (अ) (2) फक्त (ब) (3) (अ) आणि (ब) (4) (ब) आणि (क)

49. पुढीलपैकी कोणते विधान **बरोबर** आहे ?
(अ) नामास विभक्ती प्रत्यय लागला की सर्वच विशेषणांचे सामान्यरूप या-कारान्त होते.
(ब) ऊ-कारान्त विशेषणांचे सामान्यरूप होत नाही.
**पर्यायी उत्तरे :**
(1) फक्त (अ) बरोबर (2) फक्त (ब) बरोबर
(3) (अ) व (ब) दोन्ही बरोबर (4) (अ) व (ब) दोन्ही चूक

50. 'पाहता पाहता शेवटी उजाडले' या वाक्यातील 'उजाडले' हे क्रियापद कोणत्या प्रकारातील आहे ?
(1) भावकर्तृक क्रियापद (2) संयुक्त क्रियापद
(3) उभयविध क्रियापद (4) यापैकी एकही नाही

51. धातूला विविध प्रत्यय लागून क्रिया अपूरी दाखविणाऱ्या शब्दांना काय म्हणतात ?
(1) कृदन्त (2) क्रियाविशेषण (3) क्रियापद (4) विशेषण

52. 'भूपति' या शब्दाला समानार्थी शब्द सांगा.
(अ) रमापती (ब) उमापती (क) नरेश (ड) दशानन
**पर्यायी उत्तरे :**
(1) फक्त (अ) बरोबर (2) फक्त (ब) आणि (क) बरोबर
(3) फक्त (क) बरोबर (4) फक्त (क) आणि (ड) बरोबर

53. पुढील वाक्य कोणत्या प्रकारातील आहे ? – 'एकेक विषय संपवीत संपवीत प्रसादने महिनाभरात सर्व अभ्यास पूर्ण केला.'
(1) मिश्र वाक्य (2) केवल वाक्य (3) संयुक्त वाक्य (4) विध्यर्थी वाक्य

**कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK**

54. 'परिस्थिती नेहमी सारखीच असते, असे नाही, ती बदलत असते.' हे सांगण्यासाठी कोणती म्हण उपयोगात येते ?

(1) आधणातले रडतात आणि सुपातले हसतात

(2) उन्ह पाण्याने घरे जळत नसतात

(3) दैव देते आणि कर्म नेते

(4) कधी तुपाशी, कधी उपाशी

---

55. पुढील वाक्यातील प्रयोग ओळखा – 'पुण्यात्मके पापे स्वर्गा जाईजे'.

(1) सकर्मक प्रधान कर्तृक भावे प्रयोग (2) गौण कर्तृक भावे प्रयोग

(3) समापनभावे प्रयोग (4) शक्यभावे प्रयोग

---

**खालील उतारा वाचा व त्यावरील प्रश्न क्र. 56 ते 60 सोडवा.**

शिक्षणक्रमात नीतिशिक्षणाची सोय करावयास पुष्कळ जागा आहे. सामान्य शिक्षणच नीट सुधारले – ते देण्याची पुस्तके व पद्धती बदलून हव्यात तशा केल्या म्हणजे मुलांची नीतिमत्ता वाढविण्यास पुष्कळ वाव मिळेल.

सगळ्या नीतिमत्तेचे मूळ सामाजिक जीवितात आहे. इतरांशी कोणत्याही तऱ्हेचा संबंध नाही, कोणास उपद्रव नाही, कोणाचा संपर्क नाही–कोणाचे साहाय्य नको–कोणाचे कर्ज नको, अशा स्थितीत, सारांश–माळेतून तुटून निघालेल्या मण्याप्रमाणे एकाकी स्थितीत जन्म घालविणे माणसाला शक्य व इष्ट असते तर ज्या वर्तननियमांस आज आपण नीतिनियम म्हणतो त्यांचा संभव झाला नसता. अशा माणसांच्या आचरणात नीतिचा विचारच शिरत नाही. वाहते वारे आणि तापते ऊन, खालची जमीन आणि वरचे आकाश, याशिवाय दुसऱ्या कोणाची ज्यांस ओळख नसणार किंवा कोणाशी प्रसंग नसणार, झाडपाला, कंदमुळे आणि घोटभर पाणी याशिवाय ज्यांस कशाची जरूर नसणार, अशा फटिंगभाईस नीती–अनीतीचे कारणच नाही. सर्व मानवजाती जर अशीच असती तर तिलाही नीती–अनीतीचे कारण नसते. परंतु असले एकाकी जीवित मनुष्यास कधी आवडले नाही आणि अनुभवता आले नाही. मनुष्याच्या मानवेतर पूर्वजांसही लाखो पिढ्यांच्या मागेपर्यंत एकटे राहणे साधले नाही. संसार – संतानाचा आजच्याहून अन्य मार्ग जोपर्यंत सृष्टीस सापडणार नाही तोपर्यंत मनुष्यास एकटे राहणे शक्य नाही–इष्ट नाही.

एकाची दोन झाली की नवे संबंध–नवे भाव–नवे विचार–नव्या प्रेरणा आल्या, वागण्यात सामान्यत: ठराविकपणा ठेवण्याची जरूर आली आणि नीतिचा उगम झाला. आज मनुष्य एकटा नाही, दुकटा नाही, 'असंख्य टा' – नवीन शब्द बनविला तर–झाला आहे. त्याप्रमाणे त्याचे चरित्रही तितकेच असंख्य रंगांचे आणि असंख्य घटकांचे झाले आहे. नित्य नवे प्रसंग–नित्य नवे संबंध – नित्य नवे लागेबांधे निर्माण होत आहेत आणि मनुष्याच्या ऐहिक जीविताचे जाळे घोटाळ्याचे बनत आहे–बनले आहे. त्यामुळे या चक्रव्यूहात्मक संसारात दिशाभूल न होता, वाट फारशी न चुकता; आपापला कार्यभार वाहून नेण्यास मनुष्याच्या आचरणास होकायंत्राप्रमाणे काही ठरीव वळणे लागलेली पाहिजेत. ती लावावयाची म्हणजे ज्या सामाजिक जाळ्यामुळे त्यांची जरूर लागली आहे ते लहानशा प्रमाणावर मुलांच्या आयुष्यात आणि संसारात उत्पन्न करावयाचे. त्यांचे दुसऱ्यांशी संबंध वारंवार घडवून आणावयाचे. आज दोन मुलांशी – उद्या तिहींशी, परवा चारांशी – अशा रीतीने त्यांस खेळायास आणि जोडीने काम करायास लावायाचे आणि अशा प्रसंगी सगळे गाडे सुरळीत चालण्यासाठी अवश्य असेच वर्तन त्यांचे हातून घडवायचे. तसे न वागल्याचे परिणाम त्यांना भोगायास लावायचे. नीतिशिक्षणाचा हा मार्ग अवलंबण्याचे शिक्षकाने मनात आणिल्यास त्यांना ते हल्लीही करता येणार आहे.

---

कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK

56. एकाकी राहणाऱ्या माणसाला नीतिची जरूर का नसते ?

(1) त्याला मूलभूत गरजा भागणे पुरेसे असते.

(2) त्याच्या वर्तनावर नजर ठेवण्यास कोणी नसते.

(3) त्याला नीती सांगणारे कोणी नसते.

(4) इतरांचा संपर्क असेल तरच कसे वागावे हा प्रश्न येतो.

---

57. नीतिशिक्षणाचा कोणता मार्ग लेखक सुचवितात ?

(1) लहान मुलांना सामाजिक दृष्ट्या योग्य वर्तनाचे वळण लावणे.

(2) नीतिशिक्षणाचा स्वतंत्र अभ्यासक्रम देणे.

(3) नीतिमूल्यांचा वारंवार उपदेश करणे.

(4) मोठ्यांचा आदर्श त्यांच्यापुढे ठेवणे.

---

58. मनुष्यास एकटे राहणे शक्य वा इष्ट का नाही ?

(अ) एकाकी जीवन त्याला आवडत नाही.

(ब) वंशरक्षणासाठी सामूहिक जीवनाखेरीज अन्य पर्याय नाही.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (अ) (2) फक्त (ब)

(3) (अ) व (ब) दोन्ही बरोबर (4) (अ) व (ब) दोन्ही चूक

---

59. सामूहिक जीवनात नीतिनियमांची जरूर का भासते ?

(1) त्यामुळे जीवनातील विविधतेस मुक्त वाव मिळू शकतो.

(2) एकाच पद्धतीने सर्वजण वागू शकतात.

(3) अनेकांच्या परस्पर संबंधातून उद्‌भवणारे गोंधळ टाळण्यासाठी ठराविक पद्धतीने वागणे जरूरीचे असते.

(4) अनेकांमधून एखादा नीतिशास्त्रज्ञ निघू शकतो.

---

60. प्रस्तुत उताऱ्यास कोणते शीर्षक योग्य ठरेल ?

(1) नीतिशिक्षण (2) नीतिशिक्षणाचे महत्व (3) नीतिशिक्षणाचा मार्ग (4) नीतिचे महत्व

---

**कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK**

61. Even though they were close friends, they gave no quarter to each other in the boxing ring. The underlined phrase means _________.
(1) to give no wine (2) to give no money
(3) to show no mercy (4) none of the above

62. Choose the **correct** active sentence of the following statement.
Many vehicles are being looted and burnt by the agitators and hooligans.
(1) Many vehicles are looted and burnt by the agitators and hooligans.
(2) The agitators and hooligans have been looting and burning many vehicles.
(3) Many vehicles are burning and looting the agitators and hooligans.
(4) The agitators and hooligans are looting and burning many vehicles.

63. Point out the **incorrect** sentence.
(a) One may smile and smile to be an villain.
(b) Our library has many good books on Indian aesthetics.
(c) A great deal of work is yet to be done.
(d) A spade is a very useful tool in farming.
**Answer options :**
(1) (a) and (c) (2) (b) and (d)
(3) (a) only (4) All of these

64. Identify **right** or **wrong** sentence/sentences :
(a) I met him in the way.
(b) Send this letter on my address.
**Answer options :**
(1) Both (a) and (b) are right (2) Both (a) and (b) are wrong
(3) Only (a) is right (4) Only (b) is right

65. He has thrown off all his old friends since he became rich.
Identify the **correct** meaning of the phrase underlined.
(1) neglected (2) expelled (3) retorted (4) resigned

66. Point out the **incorrect** sentence.
(a) Do not cry over a spoilt milk.
(b) A loaf of bread is more essential than a good deal of advice.
(c) Biscuits are made of wheat-floor.
(d) A blade of grass dances happily in the morning sunlight.
**Answer options :**
(1) (a) and (b) (2) (a) and (c)
(3) (a) and (d) (4) only (d)

67. Use the **correct** form of adjective in the given sentence :
"This is the ________ point on this mountain range".
(1) Further (2) Furthest (3) Farther (4) Farthest

68. Which of the following sentence/sentences is/are **incorrect** ?
(a) I will dine with them on next Sunday.
(b) He went to school but returned back immediately.
**Answer options :**
(1) Both (a) and (b) (2) Only (a)
(3) Only (b) (4) (a) is correct, (b) is incorrect

69. The way he is burning the candle at both ends, he will soon be a pauper. The underlined phrase means ________.
(1) To be extravagant (2) To be reasonable
(3) To be moderate (4) None of the above

70. Point out the **correct** sentences :
(a) Are you sure for Jaya's honesty ?
(b) Water is composed of oxygen and hydrogen.
(c) Officials must do their best to comply to the regulations.
(d) We were tired of walking so sat under a huge mango tree.
**Answer options :**
(1) All of these (2) (b) and (d)
(3) (a) and (b) (4) (c) and (d)

71. 'At the crack of dawn' means ..........
(1) very early in the morning (2) accept the punishment
(3) both (1) and (2) (4) none of the above

72. Match the following :

| | 'A' | | 'B' |
|---|---|---|---|
| (a) | useful | (i) | ... ion |
| (b) | prohibit | (ii) | ... ness |
| (c) | manage | (iii) | ... ance |
| (d) | perform | (iv) | ... ment |

**Answer options :**

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (ii) | (i) | (iv) | (iii) |
| (2) | (i) | (ii) | (iii) | (iv) |
| (3) | (iii) | (i) | (iv) | (ii) |

(4) None of the above

कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK

73. Write the **correct** preposition in the blank space from the given options :
"Hari is inferior ________ Ram in intelligence."
(1) than (2) to (3) from (4) against

---

74. Match the following :

| | 'A' | | 'B' |
|---|---|---|---|
| (a) | To walk | (i) | To abridge |
| (b) | To cut | (ii) | To ramble |
| (c) | To shine | (iii) | To dine |
| (d) | To eat | (iv) | To dazzle |

**Answer options :**

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (i) | (ii) | (iii) | (iv) |
| (2) | (iv) | (ii) | (iii) | (i) |
| (3) | (ii) | (i) | (iv) | (iii) |
| (4) | (iv) | (iii) | (ii) | (i) |

---

75. A coolie ________ a heavy bundle across a railway platform.
Select the **correct** alternative to complete the sentence meaningfully.
(1) pulls (2) lugs (3) drags (4) jerks

---

76. Possitive degree :
(a) No other metal is as heavy as lead.
Comparative degree :
(b) Lead is heavier than any other metal.
**Answer options :**
(1) Only (a) is correct (2) Only (b) is correct
(3) Both (a) and (b) are correct (4) None of the above

---

77. 'Per centum' means ________.
(1) annually (2) in each hundred
(3) per day (4) percent

---

78. Find out the **correct** form of conjunction in the following sentence :
"I allow you to drive my car on condition that you shall not over speed".
The underlined words are example of :
(1) Co-ordinate conjunction (2) Subordinating conjunction
(3) Compound conjunction (4) Correlative conjunction

---

79. The gerund can be used as ..........
(a) subject of a sentence
(b) as a complement of a verb
(c) after prepositions
**Answer options :**
(1) Only (a) is correct (2) Only (b) is correct
(3) Only (c) is correct (4) (a), (b) and (c) are correct

80. Use the appropriate phrase **draw up** in the following sentence.
My solicitor _________ the lease and we both signed it.
(1) have drawn up (2) drew up (3) has drawn up (4) drawn up

81. Tell, whether the following sentence/sentences is/are **right** or **wrong** :
(a) Peace and prosperity is our ideal.
(b) I as well as they am tired of this routine work.
**Answer options :**
(1) Only (a) is right (2) Only (b) is right
(3) Both, (a) and (b) are wrong (4) Both, (a) and (b) are right

82. Choose the **correct** word for the following structure.
Incapable of being read.
(1) unreadable (2) illegible (3) unintelligible (4) illegal

83. They have opened an office _________ 28 Lees Road.
(1) at (2) on
(3) in (4) none of the above

84. I said to her, 'Will you teach me knitting ?'
(1) I said to her whether you teach me knitting.
(2) I asked her whether she would teach me knitting.
(3) I asked her that she will teach me knitting.
(4) I told her that if she will teach me knitting.

85. He hung around the entrance all day, hoping for a chance to speak to the director.
The underlined phrase means _________.
(1) loiter (2) wait (3) both, (1) and (2) (4) None of (1) and (2)

86. Tell, which of the following sentence/sentences is/are **right** or **wrong** :
(a) I have ordered for dinner.
(b) I reached at Delhi only this morning.
**Answer options :**
(1) Both, (a) and (b) are right (2) only (a) is right
(3) only (b) is right (4) Both (a) and (b) are wrong

कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK

87. I am looking forward to her arrival.

The underlined phrase means.

(1) expect with pleasure (2) see in front
(3) investigate (4) consider

88. Which one of the **four** options is the **correct antonym** of the word "Adept" ?

(1) Withold, Refrain (2) Indifferent, Unresponsive
(3) Skilled, Proficient (4) Forsake, Leave

89. Which one of the given options is **correct** about the given sentence ?
"Either she or they have to attend the meeting."

(1) Right
(2) Wrong
(3) Use of 'they' in the sentence is wrong
(4) Verb "have" should be "has"

90. Be diligent lest you fail. The underlined word is ________.

(1) Conjunction (2) Co-ordinative conjunction
(3) Subordinative conjunction (4) None of the above

91. His behaviour is sometimes childish. The underlined word means ________.

(1) like a child-in a bad sense (2) like a child-in a good sense
(3) Both, (1) and (2) (4) None of the above

92. (a) Both, Raman and Pushkaran were not present there.
(b) Neither Raman nor Pushkaran was present there.

Find out the **correct** option.

(1) only (a) (2) only (b)
(3) both, (a) and (b) (4) none of the above

93. (a) Dr. Simons has taken on the position of the Head of Department.
(b) He is the finest young player around at the moment.
(c) She was the company director when she retired.

Identify the **correct** sentence/s.

(1) Only (a) and (b) (2) Only (b) and (c)
(3) Only (b) (4) Only (c)

**कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK**

**94.** He <u>struck</u> the table. The underlined verb is ________.

(1) Intransitive
(2) Transitive
(3) Prepositional
(4) None of the above

**95.** The priest entered the <u>sacred</u> place.

Select the **correct** antonym to the word underlined.

(1) holy (2) profane (3) religious (4) auspicious

**96 - 100 : Read the passage and answer the questions given below :**

One common mistake that many people have made is this : they have thought that it would be a very good thing if everybody had exactly the same amount of money, no matter whether they worked hard or lived quite idly. They forget that very few people would work at all if it were not for the money their work brings them, and that without work there would be no money. And they have imagined that if all the money in the country were equally divided everybody would be rich. Now that is a very great mistake, because there simply is not enough money to make everybody rich. If it were shared equally all round every one then would, on the basis of the calculations made in 1935, receive only about ₹ 65 a year. Today with a rise in the price level it might be ₹ 150 a year. That may be more than you receive now or it may be less, but would certainly not make you really rich. It is quite true that there are in this country a small number of very rich people; but they are so few in comparison with the whole population that even if they were to share out all their wealth among the rest, it would make very little difference. It is said that if you flattened out that great French mountain Mont Blanc, the highest mountain in Europe, and spread it over the whole of France you would only raise the level of the land by about six inches. See if you can think out what that has to do with the question I have been talking about.

Many people, unfortunately, seem to think also that Government can always pay out money quite easily and in any quantity, and they forget, or else they do not know, that the Government can only pay out money that it has received in taxes–money that the tax-payer has had to work for.

And now here is one final mistake that I should like to warn you against. Don't ever imagine that there is any thing to be ashamed of, or anything undignified, to grumble about in having to work hard for your living. If when you start work you can go into a job that suits you, so that you can really enjoy the work itself, so much the better : I hope that is what will happen. But if the work is not exactly the kind that you would choose, you must try to remember that you are helping to produce the things that other people need; you are "doing your bit" and playing your part in the work of the world. You are like a wheel, even if it is only a very tiny wheel, in the great world-machinery of trade and industry that is always busily at work providing for the wants of hundreds of millions of people, and you must "put your back into it" and see to it that your particular task is always done as well as you can possibly do it.

**96.** Choose the **correct** option to complete the sentence.

It is necessary to work because :

(1) People want to enjoy life
(2) The country will become self sufficient
(3) Without work there would be no money
(4) It raises the standard of life

**कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK**

97. Complete the statement :

Many people, unfortunately seem to think that.

(1) The Government is very stingy

(2) The Government hoards money

(3) The Government is very rich

(4) The Government can always pay out money quite easily and in any quantity

---

98. Complete the following sentence with the **right** option.

If all the money in the world were equally divided, everybody would be..

(1) Everybody would be very poor

(2) All the people would be very rich

(3) It would certainly not make you rich

(4) You would not have to worry at all

---

99. The phrase 'doing your bit' means :

(1) Playing your part in the work of the world.

(2) To participate in your favourite game.

(3) To being very attentive.

(4) Imagining things to raise your hope.

---

100. Complete the sentence :

How much of a difference will flattening Mount Blanc make to France.

(1) There would be a huge amount of difference.

(2) It would raise the level of the land by about six inches.

(3) There would not be any difference at all.

(4) Perhaps there might not be any difference.

---

-o0o-

## सूचना — (पृष्ठ 1 वरून पुढे....)

(8) प्रश्नपुस्तिकेमध्ये विहित केलेल्या विशिष्ट जागीच कच्चे काम (रफ वर्क) करावे. प्रश्नपुस्तिकेव्यतिरिक्त उत्तरपत्रिकेवर वा इतर कागदावर कच्चे काम केल्यास ते कॉपी करण्याच्या उद्देशाने केले आहे, असे मानले जाईल व त्यानुसार उमेदवारावर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचे अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

(9) सदर प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपल्यानंतर उमेदवाराला ही प्रश्नपुस्तिका स्वत:बरोबर परीक्षाकक्षाबाहेर घेऊन जाण्यास परवानगी आहे. **मात्र परीक्षाकक्षाबाहेर जाण्यापूर्वी उमेदवाराने आपल्या उत्तरपत्रिकेचा भाग-1 समवेक्षकाकडे न विसरता परत करणे आवश्यक आहे.**

---

## नमुना प्रश्न

**प्र.क्र.** 201. "अंगावर काटा उभा रहाणे" या वाक्यप्रचाराचा अर्थ काय ?

(1) अंग शहारणे (2) रोमांचित होणे

(3) अतिशय भिती वाटणे (4) बहरुन येणे

ह्या प्रश्नाचे योग्य उत्तर "(3) अतिशय भिती वाटणे" असे आहे. त्यामुळे या प्रश्नाचे उत्तर "(3)" होईल. यास्तव खालीलप्रमाणे प्रश्न क्र. 201 समोरील उत्तर-क्रमांक "③" हे वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखविणे आवश्यक आहे.

**प्र. क्र.** 201. ① ② ● ④

अशा पद्धतीने प्रस्तुत प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाचा तुमचा उत्तरक्रमांक हा तुम्हाला स्वतंत्ररीत्या पुरविलेल्या उत्तरपत्रिकेवरील त्या त्या प्रश्नक्रमांकासमोरील संबंधित वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखवावा. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

---

**कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK**

SEAL